# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १४.०७.२०२६ मंगळवार**

**पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

दिनांक १४.०७.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, यांचे मार्गदर्शनाने व उपस्थितीत नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण १३ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे पोलीस नियंत्रण कक्ष येथील कमांड कंट्रोल सेंटर येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी  मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार आरोपींसह हजर होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. तसेच, आठवड्याचे प्रत्येक मंगळवार रोजी नागपुर शहरातील सर्व पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी अटक आरोपींना पोलीस भवन येथे हजर करणेबाबत आणि बुधवार रोजी प्रादेशिक विभाग स्तरावर सर्व पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी आपले अभिलेखावरील ०५ सक्रीय गुन्हेगारांना प्रत्यक्ष हजर करण्याचे आदेशित केले.





**(कामगिरी)**

**१) कळमणा पोलीसांची कामगिरी :— चोरीचा गुन्हा उघडकीस.**

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट नं. १७३४, मिनी माता नगर, जानकी नगर चौक, कळमणा, नागपुर येथे यांचे प्लॉट नं. १३७, गांजाखेत चौक, नागपुर येथे राहणारे फिर्यादी लोकनाथ छोटेलाल यादव वय ६२ वर्षे यांची पत्नी व लहान मुलगा असे दोघे चित्रकुट, उत्तरप्रदेश येथे गेले असल्याने, राहते घरी फिर्यादी व त्यांचा मोठा मुलगा राहत होते. दिनांक ०१.०७.२०२६ चे १०.३० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आपले राहते घराचे गेटचे दाराची कडी लावून आपले दुकानात गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दरवाजा उघडून, आंत प्रवेश करून बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख १,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकूण १,९४,०००/— रु. चा मुद्येमाल चोरुन नेला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी गौरव सचिन पालीवाल, वय १९ वर्षे, रा. प्लॉट क्र. १७३५, मिनी माता नगर, जानकी नगर गार्डन जवळ, कळमणा, नागपूर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार एक विधीसंघर्षग्रस्त बालक याचेसह संगणमताने वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपीचे ताब्यातून सोन्याची लगड व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकूण किंमती ६,११,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, पोहवा. रविकुमार शाहू, प्रदीप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव व प्रफुल्ल गोहोकार यांनी केली.



**२) अजनी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी अजय संजय पाटील वय २६ वर्षे, रा. राम मंदीर जवळ, प्लॉट क्र. १७, लाडीकर ले—आऊट, गल्ली क्र. १, अयोध्यानगर, हुडकेश्वर, नागपूर यांचे मोठ्या भावाचे नावे असलेली केटीएम कंपनीची १२५ ड्युक मोटारसायकल क्र. एम.एच. ४९ बीएफ ९८६७ किंमती अंदाजे ५०,०००/—रू. ची ही फिर्यादीकडे चालविण्यास असून, त्यांनी दिनांक ११.०७.२०२६ चे १९.३० वा. ते दि. १२.०७.२०२६ चे ०२.३० वा. चे

दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीतील शताब्दी नगर चौक जवळील त्यांचे मित्राचे भवानी सायकल स्टोअर्स समोर लॉक करून, पार्क करून ठेवली होती. काही वेळाने फिर्यादीचे मित्र दुकान बंद करुन तेथून निघुन गेले. फिर्यादी हे दारुचे नशेत असल्याने तेथेच झोपले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे अजनी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे ओम उर्फ रवि नरेंद्र येडे वय २१ वर्षे, रा. गाडीखाना मैदानाजवळ, गणेशपेठ, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे हद्दीतुन इतर ठिकाणी ०३ वाहनचोरीचे गुन्हे असे एकूण ०४ वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन मोटारसायकल क्र. १) एम.एच. ४९ बीएफ ९८६७ २) एम.एच. ४९ एस ६१७९, ३) एम.एच. ४९ ए००झेड६टीसी ४) विना नंबरप्लेटची केटीएम गाडी तसेच, गुन्हयात वापरलेली प्लेझर मोपेड क्र. ५) एमएच ३१ डीजी ८९५९ असे एकूण ०५ वाहने एकूण किंमती अंदाजे ३,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नवीनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोनि. (गुन्हे) प्रभाकर कवाडे, पोउपनि. सिदधांत मस्के, संतोष वाघमारे, पोहवा. शालिकराम शेंडे, अश्विन सहारे, नितीन सोमकुंवर, प्रविण खवसे, पोअं. रोशन वाडीभस्मे, हिमांशु पाटील व अभिषेक पांडे यांनी केली.



**<u>३) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक १४.०७.२०२६ चे ०२.५० वा. चे सुमारास, जरीपटका पोलीसांचे तपास पथकातील अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत आरोपी शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, आर.के. पब्लिक शाळेजवळ, नारा, जरीपटका येथे राहणारा हद्यपार इसम हा त्याचे घरी आला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, प्लॉट क्र. ३७/३८, आरके पब्लिक शाळेजवळ, नारा, जरीपटका येथे जाऊन चेक केल असता, तेथे एक इसम पोलीसांनी पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव रॉस्टीन उर्फ हनी रॉबर्ट अन्थोनी वय २४ वर्ष असे सांगीतले. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार

आदेश क्र. ४०/२०२६, तामील दिनांक १६.०१.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि आशिष मोरखडे, पोउपनि. सुनिल गोरडे, पोअं. राकेश सिंग, मंगेश, पंकज व नितेश यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०७.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगा—जमुना वस्ती, इरफान पान टपरी गल्ली येथे सार्वजनिक ठिकाणी एक इसम ज्याने अंगात फिक्कट हिरव्या रंगाचा टिशर्ट व काळया रंगाची लोअर पॅन्ट घातलेली असून तो शस्त्र बाळगून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सलमान खान सलीम खान वय १८ वर्षे रा. मोठा ताजबाग, सिंधीवन, पिवळया शाळेजवळ, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत खोसलेला एक लोखंडी चाकू कि. २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत घर क्र. १२५, रतन नगर, गाडगे बाबा ले—आऊट, दिघोरी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अक्षय सतिश निंबाळकर वय ३१ वर्ष हे ऑफीसचे कामाकरीता जबलपुर येथे व त्यांची आई व पत्नी हया दोघी दिनांक ११.०७.२०२६ चे १४.०० वा. ते २०.४५ वा. चे दरम्यान, आपले राहते घराला कुलुप लावुन हुडकेश्वर येथे नातेवाईकाकडे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील दोन आलमारीतील रोख १०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,४५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. पंडीत शिंडे ७७६७९३११०५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कोतवाली :—** मनिष विमलकुमार भवरे वय ३९ वर्षे तसेच त्यांची पत्नी नामे सौ. शुभांगी मनिष भवरे वय ४२ वर्ष व मुलगी नामे कु. सिध्दी मनिष भवरे वय १५ वर्ष तिघेही रा. मु.पोस्ट हिंगणी, ता. सेलू जि. वर्धा हे दिनांक २८.११.२०२५ रोजी पासून पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील अयाचित मंदीर येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले

नाहीत. **मनिष वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट ८ इंच, केस– काळे, भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **सौ.शुभांगी वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ६ इंच, केस– काळे व लांब, भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **कु. सिदधी वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ४ इंच, केस– काळे व लांब, भाषा– हिंदी/मराठी बोलते.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :–** स्वप्निल पंजावराव कडू वय ४६ वर्षे, रा. रतन कॉलनी, सोनाजीची वाडी, कोतवाली, नागपूर हे दिनांक १०.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ५ इंच, केस–काळे, अंगात–पांढरा शर्ट, तपकिरी फुलपॅन्ट घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



सौ.शुभांगी, सिदधी, मनिष



स्वप्निल

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट कं. ०६, नागपुर. | ३८३५ /२०१६ | कलम ४२० भा.दं.वि. | भोजराज सखाराम धाडवे, वय ३५ वर्ष, रा. आर्य नगर, प्लॉट क्र. ४, दहेकर यांचे घरी किरायाने, ह.मु. कला संकुल प्रोजेक्ट, जे.के बिल्डर अॅन्ड डव्हलपर्स, वार्ड क्र. १, प्लॉट क्र. ३, ३२, क्वॉर्टर क्र. २, आस्था सुपर मार्केट मागे, आर्य नगर, कोराडी, नागपुर | १६.०७.२०२६ |
| २. | मा. १७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०० ३०/ १९९६ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | १) शेखर मसराम<br>२) प्रभाकर मेश्राम<br>दोन्ही रा. रामदासपेठ काछीपुरा, घनघोर यांचे घरी, सिताबर्डी, नागपूर | १७.०७.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**